# कृषि उत्पन्न बाजार समिती, लासलगांव (जि. नाशिक)

## ❖ अ वर्ग व्यापारी अनुज्ञप्ती ❖

(नियम ६ (२) पहा)

नविन 　　　　　　　　　　　　　　　　अनुज्ञप्ती क्र.५२४

वर्ष०२५-२६

मे. / विश्वा इन्टरनॅशनल 　　　　　　　　श्री. ओम विश्वकर्मा

पत्ता के -१०६,लक्ष्मीनगर इस्ट दिल्ली.

यांनी ज्याचा यात यापुढे 'अनुज्ञप्तीधारी' असा उल्लेख करण्यात आला आहे. रुपये२३० 　　फी दिनांक ०३/०६/२०२५ रोजी भरल्यानंतर मुख्य / उपबाजार आवार / तात्पुरते खरेदी-विक्री केंद्र विंचुर येथे नियमित शेतीमाल (शेंगा, शेंगदाणे, आळशी, गुळ, तुर, मुग, मठ, करडई, गहु, बाजरी, ज्वारी, हरभरा, मेथी, कुळीद, राई, (मोहरी), तीळ, मिरची, (ओली/सुकी), चिंच, एरंडी, उडीद, सरकी, भात, तांदुळ, कापुस (सरकीचा / बिन सरकीचा), सुर्यफल, सोयाबीन, बांबु, जळाऊ लाकुड, बेदाणा, मका, कांदा, नागवेलीची पाने, टोमॅटो, द्राक्षे, डाळींब, भाजीपाला (i) बटाटे, (ii) सुरण, (iii) रताळी, (iv)सर्व प्रकारच्या पालेभाज्या व ताज्या भाज्या) यांचा धंदा करण्यासाठी म्हणून महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) नियम, १९६७ आणि बाजार समितीचे मंजुर आदर्श उपविधी यांच्या उपबंधास व पुढील शर्तीस अधीन राहुन, यांस याद्वारे अनुज्ञप्ती मंजुर करण्यात येत आहे.

**त्या शर्ती अशा :-**

१) अनुज्ञप्तीधारीने, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) नियम, १९६७ व लासलगांव कृषि उत्पन्न बाजार समितीचे मंजुर आदर्श उपविधी यांच्या उपबंधाचे आणि दि.१८/१२/२०२५ 　　रोजी अनुज्ञप्तीधारीने बाजार समितीशी केलेल्या कराराच्या शर्तीचे पालन केले पाहिजे.

२) ही अनुज्ञप्ती दि. ३१/०३/२०२६ 　पर्यंत (असल्याने) सदर दिवस धरुन वैध असेल, आणि त्यानंतर त्याचे नुतनीकरण केले असल्याखेरीज ती चालणार नाही.

३) अनुज्ञप्तीचे हस्तांतरण करता येणार नाही.

४) हा अधिनियम आणि त्यान्वये करण्यात आलेल्या नियमांच्या उपबंधास अनुसरुन ही अनुज्ञप्ती रद्द केली जाण्यास, तहकुब केली जाण्यास पात्र असेल.

५) ही अनुज्ञप्ती रद्द केली जाण्यास, तहकुब करण्यात आल्यास अनुज्ञप्तीधारीने ती बाजार समितीच्या स्वाधीन केली पाहीजे.

६) अनुज्ञप्तीधारकाने केवळ '**अ वर्ग व्यापारी**' म्हणुनच आणि ज्या जागांसाठी अनुज्ञप्ती देण्यात आली असेल, त्याच जागामध्ये धंदा केला पाहिजे आणि अनुज्ञप्तीधारकाने त्याला, या नियमान्वये दिलेल्या दुसऱ्या अनुज्ञप्तीनुसार कोणत्याही इतर धंद्याकरीता असल्याखेरीज, या बाजार कार्यकर्त्यांच्या धंद्याशिवाय त्यांनी बाजार क्षेत्रात इतर कोणताही धंदा करता कामा नये.

७) अनुज्ञप्तीधारीने, कोणत्याही जाहीर केलेल्या शेतीच्या उत्पन्नाची भेसळ करता किंवा भेसळ करविता कामा नये.

८) अनुज्ञप्तीधारकाने, बाजार समितीची फी टाळण्यास प्रतिबंध करण्याचे कामी बाजार समितीस मदत केली पाहिजे.

९) अनुज्ञप्तीधारी हा, ज्यांची नावे पुढे देण्यात आली आहे. अशा त्याच्या सहाय्यकांखेरीज इतर कोणासही जाहीर केलेल्या शेती उत्पन्नाच्या खरेदी-विक्रीच्या काही कामास लावणार नाही.

| | |
|---|---|
| १) | २) |
| ३) श्री.मोहसीनअकबर शेख. | श्री४) आवेज रऊफ तांबोळी |
| ५) श्री. अझर नुर शेख | ६) |

अशा रितीने कामावर लावलेल्या सहाय्यकांनी जाहीर केलेल्या शेती उत्पन्नाच्या खरेदी-विक्री संबंधातील सर्व कृत्ये अनुज्ञप्तीधारींच्या स्पष्ट किंवा गर्भित परवानगीने केली आहेत असे समजण्यात येईल.

१०) अनुज्ञप्तीधारीने, बाजार समिती फर्मावील त्या रितीने पुस्तके, नोंदणीपुस्तके आणि दस्तऐवज ठेवले पाहिजेत. आणि सभापती, उपसभापती, सचिव किंवा बाजार समितीने प्राधिकृत केलेला इतर अधिकारी यांस तपासणीसाठी म्हणुन उक्त पुस्तके उपलब्ध करुन दिली पाहिजेत.

११) अनुज्ञप्तीधारीने, बाजार समितीस वेळोवेळी आवश्यक वाटेल अशी माहिती आणि विवरणे दिली पाहिजेत.

१२) अनुज्ञप्तीधारीने, बाजार समितीच्या उपविधीन्वये अनुज्ञेय असेल अशा रितीने शेती उत्पन्नाची किंमत निश्चित केली पाहिजे. (आणि महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी - विक्री (विकास व विनियमन) नियम, १९६७ नुसार लेखा

*(मागे पहा पान नं. ०२....)*

चिठ्ठी आणि / किंवा खरेदी (देयके) बिले दिली पाहिजेत.) **चौकोनी कंसातील मजकुर दलालास लागु नाही.**

१३) अनुज्ञप्तीधारीने, जर शेतीचे उत्पन्न त्याच्या अभिकरणामार्फत / त्याजकडुन विकण्यात येईल तर, त्याच दिवशी शेती उत्पन्नाची विक्रत्यास, किंमत दिली पाहिजे.

१४) अनुज्ञप्तीधारकाने, हा अधिनियम, नियम व उपविधी यातील तरतुदीनुसार ठरविलेल्या फी खेरीज कोणतीही फी मागता कामा नये किंवा ती वसुल करता कामा नये.

१५) अनुज्ञप्तीधारीने, व्यापार विषयक कोणताही सुट देता किंवा वसुल करता कामा नये.

१६) अनुज्ञप्तीधारकाने, दलाल म्हणुन व्यापाऱ्या-व्यापा-यातील व्यवहार व कोंबड्या, गुरे, मेंढरे व बकरे खेरीज करुन इतर जाहीर केलेल्या शेतीच्या उत्पन्नाच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारात काम करता कामा नये. **(ही तरतुद फक्त दलालास लागु आहे.)**

१७) अनुज्ञप्तीधारीने, केवळ अधिकृत वजने व मापे यांची तरतुद केली पाहिजे आणि बाजार समितीकडुन मान्य करण्यात येईल अशाच ठिकाणी वजन करण्याचे काम केले पाहिजे.

१८) अनुज्ञप्तीधारीने, अनुज्ञप्ती देण्यात आलेल्या वजन करणाऱ्या किंवा मापणाऱ्यास हमालास, बाजार समिती मान्य करील अशा दरानेच केवळ पैसे दिले पाहिजेत आणि कोणत्याही घरगुती किंवा खाजगी कामावर त्यास लावता कामा नये. **(ही तरतुद फक्त अडत्यास लागु आहे.)**

१९) अनुज्ञप्तीधारीने, **(अडत्यास लागु असलेला)** नियम ८ मध्ये दिलेल्या शर्ती पुर्ण केल्यानंतर असेल त्याशिवाय त्याच्या स्वत:च्या नावाने किंवा स्वत:च्या आणि इतरांच्या नावे संयुक्तपणे, त्याच्या अडतीत आणण्यात आलेल्या शेती उत्पन्नाची खरेदी करता कामा नये.

२०) अनुज्ञप्तीधारीने, पेढीच्या भागीदारीत, करण्यात आलेला कोणताही बदल असल्यास, बाजार समितीस कळविला पाहिजे.

२१) अनुज्ञप्तीधारीने, शेती उत्पन्नाच्या खरेदी-विक्री संबंधातील त्याचे सर्व विवाद महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) नियम, १९६७ अन्वये तरतुद केलेल्या रितीने पाठविले पाहिजेत.

**ठिकाण :-** लासलगांव
**दिनांक :** 3 JUN 2025

सभापती,
कृषि उत्पन्न बाजार समिती, लासलगांव
(जि.नाशिक)

**※ अनुज्ञप्तीचे नुतनीकरण ※**

| नुतनीकरणाचा दिनांक | ज्या मुदतीसाठी नुतनीकरण करण्यात आले असेल ती मुदत | सभापतीची सही व मुद्रा |
|---|---|---|
| | | |